आर.एन.आय. भारत सरकार नवी दिल्ली
रजि.- MAHMAR-36829-2010

ISSN : 2229-4929

# अक्षर वाङ्मय

०४ मार्च २०२०

: संपादक :
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

: कार्यकारी संपादक :
डॉ. भास्कर ताम्हनकर

: संपादक मंडळ :
डॉ. शशिकांत श्रृंगारे
डॉ. शीतल गोर्डे-पाटील

: मार्गदर्शक :
श्री. सागर फडके

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन, 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर-४१३५१५.
मुद्रक : कल्पना मल्टीटेक, ४६१/४ सदाशिव पेठ, पुणे-३०.
साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता : डॉ.नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि.लातूर-४१३५१५, भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१,
ई-मेल : suryawanshinanasaheb67@gmail.com
अक्षर जुळणी : शिवाजी ज्ञा. पांचाळ, लातूर, भ्रमणध्वनी : ९७६६२४०१२६,
ई-मेल : shivajipanchal8@gmail.com स्वागत मूल्य : रू.१,०००/-

*अक्षर वाङ्मयातील प्रकाशित मजकुराशी व लेखकांच्या मताशी प्रकाशक, संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.*



प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १८. | स्त्रीवादी साहित्य | डॉ.मनीषा आझाद गायकवाड | ८६ |
| १९. | 'अंधारवाडा' या महानगरीय कादंबरीतील स्त्रीवादाचे चित्रण | डॉ. शीला भगपाल रत्नाकर | ९२ |
| २०. | सानिया यांच्या कथासाहित्यातून उमटलेला स्त्रीवाद- एक दृष्टिक्षेप | सुवर्णा रामचंद्र शिंगाडे | ९८ |
| २१. | नाशिक जिल्ह्यातील लोकोत्सवातील स्त्रीमन | प्रा. पंकज पवार | १०६ |
| २२. | स्त्रीवादी साहित्य-समीक्षा | डॉ. सागर अशोक लटके | ११३ |
| २३. | मेघना पेठे यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री जाणीवा | डॉ. राजश्री चंडोपंत पोवार | ११७ |
| २४. | स्त्रीवादी साहित्य : भूमिका आणि स्वरूप | जयश्री शिंदे-गायकवाड | १२२ |
| २५. | 'आयदान' : स्त्रीवादी आकलन | डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे | १२९ |
| २६. | स्त्रीवादाचे स्वरुप आणि स्त्री सबलीकरणाची आजची स्थिती | डॉ. आनंद वारके | १३४ |
| २७. | मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीवा | डॉ. विजया प्रशांत पवार | १३९ |
| २८. | भारतीय लोकसाहित्यातून प्रकट होणारे 'स्त्री' जीवन | निवृत्ती मारोतराव टार्फे | १४७ |
| २९. | पौराणिक कादंबरीतून उमटलेला स्त्रीवाद | डॉ. सुवर्णा तानाजीराव जाधव | १५३ |
| ३०. | स्त्रीवादी संकल्पना आणि सिद्धांत | डॉ. प्रताप गायकवाड | १५९ |
| ३१. | कष्टकरी स्त्री जीवनाची कैफियत : डोंगरमाथा | सचिन माधवराव कोतकर | १६४ |
| ३२. | 'समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य' | श्रीरंग अरविंद तराळ | १६८ |
| ३३. | 'आयदान' मधील स्त्रीवादी जाणिवा | भारती श्रीधर कोळेकर | १७७ |
| ३४. | ओवी : 'स्त्री' जीवनातील विविधांगी अनुभव दर्शन' | संजय चव्हाण | १८४ |
| ३५. | एकविसाव्या शतकातील जबाबदार स्त्रीचे स्थान | अजितकुमार भिमराव पाटील | १९० |

# 'आयदान' : स्त्रीवादी आकलन

डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे
विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर

भारतीय समाजाची रचना जातीव्यवस्थेने बांधली गेली आहे. त्याचबरोबर श्रेष्ठ–कनिष्ठ, उच्च–नीच, गरीब–श्रीमंत असा भेदभावही दिसून येतो. स्त्री–पुरुष हा भेदभाव तर मोठ्या प्रमाणावर दिसतो. आजही स्त्रियांना समाजात मानाचे स्थान दिसत नाही. स्त्रीला स्वतंत्र विचारांनी जगता येत नाही. आपल्यावर होणार्या अन्याय, अत्याचाराला स्त्रियांनी आपल्या लेखणीतून वाचा फोडली. दलित समाजातील स्त्रियांची होणारी घुसमट, वेदना अनेक दलित स्त्रियांनी आपल्या आत्मकथनातून मांडली आहे. सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले उर्मिला पवार यांचे 'आयदान' हे दलित स्त्रीवादी आत्मकथन एकूणच मराठी साहित्यामध्ये महत्त्वाचे ठरते.

'आयदान' हे स्वकथन आंबेडकरवादी आणि स्त्रीवादी दृष्टिकोनातून लिहिले गेले आहे. आजपर्यंतच्या लिहिलेल्या दलित आत्मकथनापेक्षा हे आत्मकथन वेगळे आणि अभिनव असे आहे. या आत्मकथनातील आंबेडकरवादास स्त्रीवादाची जोड मिळाल्यामुळे आशयाच्या मांडणीत एक वेगळीच प्रगल्भता आली आहे. पण त्याचबरोबर उर्मिला पवार यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव अगदी प्रामाणिक आणि प्रांजळपणे व्यक्त केल्यामुळे या आत्मचरित्राने एक वेगळीच उंची गाठली आहे. लेखिकेने आपले मनोगत व्यक्त केलेच आहे. पण त्याबरोबरच स्वतरू अनुभवलेल्या, भोगलेल्या स्त्री–दुरूख, अवतीभोवतीचा समाज परिसर, नात्यागोत्यातील आलेले अनुभव व्यक्त केले आहे. उर्मिला पवार यांची आई (प्रमिला पवार) या आयदान (सुप) तयार करत असत. 'आयदान' म्हणजेच संसारात बांबुपासून तयार केलेले सुपं, रोवळ्या, परड्या, हारे, करंडे इ. वस्तूंना महत्त्व होते. या वस्तूंचं सामान्यरुप म्हणजे 'आयदान' यालाच 'आवत' असेही म्हटले जाते. कोकणाबाहेर 'बुरुड' नावाच्या भटक्या विपुल जातींचा पोट भरण्याचा हा व्यवसाय आहे. कोकणात हा व्यवसाय अनुसूचित जातींच्या यादीत असलेल्या 'महार' या जातीकडे असत. आयदान या प्रतीकातून या दुरूखाची वीण, त्याचे अनेक गुंतागुंतीचे अनेक दुरूखाचे पदर त्या सहजपणे शब्दबद्ध करतात. उर्मिला पवारांची आई आयदान तयार करत असत तेव्हा लहानपणापासून लेखिकेने हे सर्व अनुभव घेतले. दलित जातीत जन्माला आल्यामुळे जातीय मानसिकतेचे आलेले अनुभव, एक दलित स्त्री म्हणून वाट्याला आलेले दुरूखानुभव आणि एक स्त्री म्हणून वाट्याला आलेले अनुभव अशा तीन पातळींवरच्या अनुभवांची मांडणी लेखिकेने अत्यंत मार्मिकपणे आणि सहजपणे केली आहे.

महाड ते राजापूर या मध्य कोकणातल्या मागासलेल्या भागातल्या मागासलेल्या जातीत मुलगी म्हणून जन्मलेल्या उर्मिला पवार, कोकणातील व मुंबईतील आपल्या व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक आयुष्यातील अनुभवांचे अत्यंत प्रांजळ, सहज आणि निरूसंकोच कथन त्यांनी केले आहे. आपले गाव, घर, कुटुंबीय, शाळा, मास्तर, खेळ, छंद, आपले मोठे होणे, प्रेमात पडणे, लग्न, सासरी

एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून करते त्यावेळी ती एका विशिष्ठ व्यवस्थेकडून शोषित ठरणारा आपला नवरा दुसऱ्या (पुरुषसत्ताक) व्यवस्थेच्या आधारे आपले कसे शोषण करीत होता हे बिनधास्तपणे मांडते असे विचार परखडपणे मांडण्याचे सामर्थ्य लेखिकेला स्त्रीविषयक प्रगत विचाराने दिले आहे. समाजातील जातीव्यवस्था किती प्रखरपणे जाणवते याची अनेक उदाहरणे 'आयदान'मध्ये दिसून येतात. धर्मशास्त्राप्रमाणे स्त्रीला शूद्र ठरविणारा समाज योनिशुचिता, स्त्रीदेहाचे पावित्र्य या गोष्टीला महत्व देत होता. याला अस्पृश्य समाजातील पुरुषही अपवाद नव्हता. उर्मिला पवार 'आयदान' मध्ये आपल्याला येणाऱ्या अनुभवांविषयी लिहितात तेव्हा त्या अभिव्यक्तीच्या पातळीवर बंडखोरी करत असलेल्या दिसतात. हे अनुभव पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेला अधोरेखित करणारे आहेत. विवाहानंतर प्रथमच पत्नीशी शारीरिक संबंध आल्यानंतर हरिश्चंद्र निवेदक स्त्रीला 'तू फारच थंड बुवा' अशी जी प्रतिक्रिया देतो ती प्रतिक्रिया वरवर तक्रारीची असली तरी ती प्रथम शारीरसंबंधप्रसंगी स्व–स्त्रीचा जो अनुभव त्याला येतो तो अनुभव त्याच्यासाठी सुखावह ठरतो. तो आपल्या स्त्रीला शारीरिक संबंधांचा अनुभव नाही म्हणजे आपली स्त्री पवित्र आहे या भावनेमुळे होय. शरीरसुखाच्या अनुभवामुळे तो तृप्त झालेला असला, त्या अनुभवाने तो आनंदी झालेला असला तरी त्याच्यासाठी आपली पत्नी पवित्र आहे हा आनंद मोठा ठरतो. तेव्हा त्याच्या मनावर पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेचा किती प्रभाव होता हेच तीव्रतेने स्पष्ट होत राहते."५

उर्मिला बी.ए. ची पदवी संपादन करते तेव्हा तिच्या पतीलाही आनंद होतो. पण एम.ए. साठी प्रवेश घेते तेव्हा पती आणि पत्नीत यांच्यात संघर्ष सुरु होतो. पतीची मानसिकता अशी की, घरची संपूर्ण जबाबदारी बाईची असते पण मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांनी हरिश्चंद्रचा राग आणि दारुचं व्यसन वाढत जातं. पतीच्या या दुटप्पी भूमिकेविषयी लेखिका लिहिते, "मिस्टर पवारांचं माझ्याशी दोन पातळ्यांवरचं वर्तन होतं. एका बाजूला आपली पत्नी लिहिते, बोलते याबद्दल त्यांना कौतुक होतं आणि दुसऱ्या बाजूला माझ्या लेखना बोलण्याबद्दल त्यांना माझा राग येत होता."६ लेखिका हे निमूटपणे सहन करते पण ज्यावेळी मैत्रिण ग्रुपच्या सहवासात येते त्यावेळी तिचं सामाजिक भानच प्रगल्भ होत नाही तर त्याच्या कक्षाही रुंदावतात आणि यातूनच तिची स्त्री अस्मिता व स्त्रीचं अस्तित्व याविषयी तिची मौलिक दृष्टी विकसित होते. त्यावेळी ती स्वतःचे मत मांडते, "एका बाजूला स्त्री ही सुद्धा पुरुषांप्रमाणे एक व्यक्ती आहे, व्यक्तीला मिळणारे सर्व अधिकार तिला मिळाले पाहिजेत. पुरुषाकडे मसल पॉवर असेल तर स्त्रीकडे जननशक्ती आहे. दोन शक्ती वेगवेगळ्या आहेत. त्यांचं एकत्रीत मूल्यमापन न होता स्वतंत्रपणे झाले पाहिजे वगैरे अनेक विचारांचे बिजांकूर माझ्या मनात फुलत होते."७ याच विचारांनी प्रेरित होऊन लेखीका आंबेडकरी चळवळ, दलित साहित्य, स्त्री चळवळ, स्त्री साहित्य यांचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करुन स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करते.

लेखन, सामाजिक चळवळी अशा विविध क्षेत्रात वाटचाल करताना लेखिकेचे व्यक्तिमत्व, वैचारिक भूमिका घडत गेली आहे. त्यामध्ये वाढते आत्मभान, आत्मपरिक्षण, समाजजीवनाचे निरीक्षण केले आहे. "मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती की, दलित मुक्ती चळवळीस स्त्री प्रश्नांना महत्त्व नव्हता नि स्त्री मुक्ती चळवळ दलित मुक्ती चळवळीकडे उदासिनतेने पाहत होती. आजही त्यात फरक पडलेला नाही. हे उर्मिला पवारांचे भाष्य अंतर्मुख करणारे आहे. एक दलित स्त्रीचे आत्मकथन म्हणून केवळ आयदानचे महत्त्व नाही, तर दलित स्त्री जाणीवेचे रुपांतर एका व्यापक समग्र, सामाजिक आकलनात करणारे आत्मकथन म्हणून ते महत्त्वाचे आहे."१ लेखिका त्यावेळी 'मैत्रिण' सारख्या स्त्री संघटनेत सहभागी होते नि पुढे स्वत:ची 'संवादिनी' नावाची स्त्री संघटनाही उभारते. या संघटनेच्या माध्यमातून आणि बळातून ती स्त्रियांवरील अन्याय, अत्याचारांचा निर्भिडपणे सामना करते. भर रस्त्यात आपल्या पत्नीला दारु पिऊन मारहाण करणाऱ्या नवऱ्याला लेखिका विचारते, "अरे बाबा, तु हे काय चालवलंयस? त्या बाईचा काही अपराध असेल तो तोंडाने सांग नाहीतर तुला आता पोलीसात देते."२ ज्यावेळी लेखिकेला स्त्रीहीच स्त्रीची शत्रू आहे असा अनुभव जेव्हा येतो त्यावेळी सुनेला छळत असलेल्या सासूला लेखिका चांगलाच धडा शिकविते व विचारते, "तू एक बाई असून बाईवर अन्याय करतेस हे तुला शोभतं का?"३ स्त्रियांचा उद्धार व्हावा, त्यांना स्वातंत्र्य मिळावे यासाठी लेखिका आक्रमक होऊन धडपडतांना दिसते. एकूणच दुर्गम दऱ्याखोऱ्यातील स्त्री जीवनाच्या चित्रणापासून ते आधुनिक स्त्री मुक्तीवादी, स्त्री स्वातंत्र्यवादी चळवळीच्या चित्रणापर्यंतचा लेखिकेचा जीवंत अनुभव व्यक्त केलेला आहे. 'आयदान' या आत्मकथनामध्ये उर्मिला पवार यांची स्त्रीच्या गुलामीपासून ते स्त्री स्वातंत्र्यापर्यंतची संघर्षमय वाटचाल प्रत्ययास येते. विद्युत भागवत म्हणतात, "स्त्रियांच्या आत्मकथनातील 'आत्म' हा बहुतेकवेळा आत्मस्वरुपाचा म्हणजे अणुवत वा सुटा कधी असत नाही. असा सार्थ दावा केला जातो. मला वाटते दलित–कष्टकरी वर्गातील स्त्रीवादी भान अशा सुट्या 'आत्म' ला नाकारुन समुहाला स्वतःत अभिव्यक्त करीत असते. अनेक प्रमुख प्रवाही आत्मचरित्रामध्ये 'मी' ची जाणीव सुटेपणाने येते आणि अशी व्यक्तीवादी चौकट स्वीकारणे म्हणजे ज्ञाननिर्मिती असे मानले जाते. स्त्रियांच्या आत्मचरित्रात्मक लेखनातून जे सामाजिक आणि मानसशास्त्रीय पैलू साकारतात त्यामधून अनेक व्यक्ती, त्यांचा भोवतीचा समुदाय आदींचे योगदान स्पष्ट स्पष्ट दिसते."४ आजच्या परिस्थितील स्त्रीवादी जाणीवेतून एक चांगले भान आले आहे असे वाटते.

'आयदान' च्या लेखिकेच्या मनावर आंबेडकरवादी व स्त्रीवादी अशा दोन परिवर्तनवादी विचारवारसांचा प्रभाव दिसून येतो. वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेला नकार देण्याचे, माणसाचे मनुष्यत्व नाकारणाऱ्या हिंदू धर्माचे जोखड नाकारण्याचे, सामर्थ्य तिला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून लाभलेले आहे आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला असलेले दुय्यमत्व नाकारण्याचे सामर्थ्य तिला स्त्रीवादी विचारांनी प्रेरित केले आहे. एकीकडे पुरुषी व्यवस्था स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व आणि तिचे 'स्व' नाकारीत होता आणि आहे हे ज्ञान तिला स्त्रीवादी विचारधारेच्या परिचयातून होते. ज्यावेळी हरिश्चंद्र पुरुष म्हणून जे अनुभव तिला देऊ पाहत होता तेव्हा ती स्वत:चाच विचार

**समारोप :**

एकूणच 'आयदान' हे आत्मकथन समाज आणि संस्कृतीचा दस्तऐवज आहे. यामध्ये एका दलित स्त्रीचं आत्मकथन नाही तर त्यात अनेक दलित स्त्रियांच्या जीवनाचं प्रातिनिधिक स्वरुपात दर्शन घडते. दलित स्त्रीच्या अस्तित्वाबरोबर तिच्या अस्मितेची चर्चा लेखिकेने केली आहे. स्त्रियांच्या जीवनात दुःख निर्माण करण्यास कौटुंबिक परिस्थिती आणि सामाजिक स्थिती कारणीभूत आहे याचे यथार्थ विवेचन ऊर्मिला पवार आपल्या आत्मकथनात करतात. 'आयदान' हे दलित स्त्रीवादी आत्मकथन किंवा स्वकथन म्हणून सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

**संदर्भ :**


१. डॉ. सिसिलिया कार्व्हालो, सतीश काळसेकर (संपा.), 'आयदान रू सांस्कृतिक ठेवा', लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००७, पृ. २४.

२. ऊर्मिला पवार, 'आयदान', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००३, पृ. ११.

३. तत्रैव, पृ. २३५

४. डॉ. सिसिलिया कार्व्हालो, सतीश काळसेकर (संपा.), 'आयदान रू सांस्कृतिक ठेवा', लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००७, पृ. ८२

५. तत्रैव, पृ. ९८.

६. ऊर्मिला पवार, 'आयदान', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००३, पृ. २०८.

७. तत्रैव, पृ. २०९.


---